जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- १० मार्च, २०२३

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेतून निवडून देण्यासाठी व्यवस्थापन प्रतिनीधी गटाच्या खुल्या संवर्गातून एक व अनुसूचित जमाती संवर्गातून एक, अध्यापक गटाच्या खुल्या संवर्गातून एक व विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातून एक, नोंदणीकृत पदवीधर गटाच्या खुल्या संवर्गातून एक व इतर मागास प्रवर्गातून एक अर्ज आहेत मात्र प्राचार्य गटातील खुल्या सवंर्गात दोन अर्ज शिल्लक राहिल्यामुळे या गटासाठी १६ मार्च रोजी निवडणूक होणार आहे.

अधिसभेवर निवडून आलेल्या प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनीधी आणि नोंदणीकृत पदवीधर यांच्या प्रतिनीधींमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यां करिता विद्यापीठाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. दि.१६ मार्च रोजी अधिसभा बैठकीत ही निवडणूक होणार आहे. ९ मार्च रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. त्यानंतर विद्यापीठाने अंतिम उमेदवारांची यादी आज दि.१० मार्च रोजी जाहीर केली. प्राचार्यांच्या खुल्या संवर्गात एका जागेसाठी दोन अर्ज शिल्लक आहेत. प्राचार्य किशोर पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनगीर) व प्राचार्य संजय सुराणा (आर.सी.पटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मा, शिरपूर) या दोघांमध्ये निवडणूक होईल. व्यवस्थापन प्रतिनीधींमधून खुल्या संवर्गात एका जागेसाठी केवळ नंदकुमार बेंडाळे (केसीईई संस्था, जळगाव) यांचा एकमेव अर्ज प्राप्त झालेला आहे. याच गटात अनुसूचित जमाती संवर्गातील एका जागेसाठी विसरवाडी येथील भरत गावित यांचा एकमेव अर्ज आहे. अध्यापकांच्या खुल्या संवर्गात एका जागेसाठी दोन अर्ज प्राप्त झाले होते. मात्र एका उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यामुळे म्हसदी येथील कै.अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.शिवाजी पाटील यांचा एकमेव अर्ज शिल्लक राहिला आहे. याच गटातील विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गात एका जागेसाठी जळगावच्या मु.जे. महाविद्यालयातील प्रा.सुरेखा पालवे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झालेला आहे. नोंदणीकृत पदवीधर गटातून खुल्या संवर्गातील एका जागेसाठी दोन अर्ज प्राप्त झाले होते. एका उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यामुळे भडगाव येथील अमोल पाटील एकमेव अर्ज शिल्लक राहिला आहे. याच गटात इतर मागासवर्ग संवर्गातून जामनेर येथील नितीन झाल्टे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झालेला आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

## बातमी क्र.२

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे आयोजित परीसर मुलाखतीमध्ये तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठीय केमिकल टेक्नालॉजी संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी गद्रे मरीन एक्स्पोर्ट प्रा.लि. रत्नागिरी ह्या कंपनीतर्फे आयोजित मुलाखतीमध्ये बी.टेक. फूड टेक्नॉलॉजीच्या ओंकार भोसले, प्रतिक्षा श्रीखंडे व सत्वशील नरुटे या तीन विद्यार्थ्यांची वार्षिक ३.६९ लाख वेतनावर निवड करण्यात आली. या मुलाखती घेण्यासाठी कंपनीचे एच आर राजेंद्र पवार, एजीएम ( आर ॲण्ड डी ) मंदार निवांडे वेलफेअर ऑफीसर ओंकार कोकजे हे उपस्थित होते. या परीसर मुलाखतीमध्ये १५ विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा व तदनंतर मुलाखती घेण्यात आल्या. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळा संचालक प्रा. जे.बी. नाईक, प्रा.विशाल पराते यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या मुलाखतीचे व्यवस्थापन समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले.

# बातमी क्र.3

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उमवि मनस्विनी महिलांच्या ग्रुपतर्फे शनिवार, दिनांक ११ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ॲक्युप्रेशर आणि आरोग्य समस्या या विषयांवर जळगाव येथील डॉ. निशीगंधा नेमाडे आणि डॉ. सुहास नेमाडे (नॅचरोपॅथी) हे व्याख्यान घेणार आहेत. या कार्यक्रमात विद्यापीठातील सर्व नियमित महिला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कंत्राटी शिक्षक/कर्मचारी, दैनिक वेतनिक तसेच विद्यार्थिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारीकरिता